पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-२०२२
'B++ Grade (CGPA २.९६)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११६ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in



## पात्रता विभाग

जा.क्र. पुअहोसोविसो / पात्रता विभाग / २०२२-२३ / 7734 दि. 26 SEP 2022

**प्रति**

**मा. प्राचार्य / प्र.प्राचार्य / संचालक**
**सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले,**
**प्रस्तुत विद्यापीठ**

**विषय : स्वायत्त महाविद्यालयातून विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश, पात्रता नियमावली बाबत. ..**

संदर्भ : मा. अधिष्ठाता मंडळाने शिफारस केलेल्या नियमावलीस विद्या परिषदेच्यावतीने मा. कुलगुरु महोदया यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये दिलेली मान्यता

**महोदय / महोदया,**

स्वायत्त महाविद्यालयातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व्दितीय व तृतीय वर्षास प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावलीस उपरोक्त संदर्भान्वये मान्यता मिळालेली आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालय / शैक्षणिक संकुलात स्वायत्त महाविद्यालयातून विद्यार्थी प्रवेशित घेवू इच्छित असल्यास, खालील नियमावलीप्रमाणे प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| १. | स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात सर्व विद्याशाखांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या व्दितीय व तृतीय वर्षास व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षास प्रवेश घेतल्यानंतर पात्रता करुन घेणे अनिवार्य राहील. |
| २. | स्वायत्त महाविद्यायातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात प्रवेश घेतवेळी संबंधित विद्यार्थी हा स्वायत्त महाविद्यालयातील प्रथम / व्दितीय वर्षातील सर्व विषय उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. तद्नंतरच प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या व्दितीय / तृतीय वर्षास प्रवेश देता येईल. |
| ३. | स्वायत्त महाविद्यालयातून या विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात व्दितीय व तृतीय वर्षास प्रवेश देण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत राहील. तद्नंतर प्रवेश देता येणार नाही. |
| ४. | प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विषयाची समकक्ष विषयांची तपासणी विद्यापीठामार्फत संबंधित विद्याशाखेच्या मा. अधिष्ठाता यांच्याकडून करुन घेणे आवश्यक राहील. |
| ५. | अशा विद्यार्थ्यांची निकालाची कार्यवाही ही त्यांच्या प्रथम / व्दितीय वर्षातील एकूण प्राप्त गुण (Grand Total) हे प्रस्तुत विद्यापीठ प्रचलित अभ्यासक्रमानुसार समान असेल तर, तसेच गुण द्यावेत तथापि असमान गुण असतील तर त्या एकूण गुणांचे विद्यापीठ प्रचलित अभ्यासक्रमानुसार रुपांतरीत एकूण गुण / श्रेणी Conversion मध्ये करुन सदर विद्यार्थ्यांचा निकाल विद्यापीठ नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे जाहीर करण्यात यावा. अशा विद्यार्थ्यांना पदवी विद्यापीठ नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच देण्यात यावी. |

| | |
|---|---|
| ६. | स्वायत्त महाविद्यालयातून या विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात प्रवेश घेतेवेळी या विद्यापीठाचे प्रचलित अभ्यासक्रम व परीक्षा पध्दतील संबंधित विद्यार्थ्यांस लागू राहतील. |
| ७. | स्वायत्त महाविद्यालयातून या विद्यापीठात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश व पात्रता शुल्क प्रचलित शुल्काप्रमाणेच लागू राहतील. |
| ८. | स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या विद्यापीठात प्रवेश देण्यापूर्वी महाविद्यालयाने विद्यापीठाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. |
| ९. | उक्त नियम हे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लागू राहतील. |
| १०. | अभियांत्रिकी व विधी स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी या विद्यापीठात व्दितीय व पुढे प्रवेश घेताना जे इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश व पात्रता नियम लागू आहेत ते तसेच लागू राहतील. |

आपली स्नेहांकित,

२६/९/२२

(योगिनी घारे)
कुलसचिव

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)